**<u>शाळा बाह्य मुलांना नियमित शाळेत दाखल करणे आणि उपस्थिती टिकवून ठेवणे यासाठीच्या उपाययोजना.</u>**
**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ प्रमाणे**

## महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः आरटीई २०१३/प्र.क्र.८/१३ प्राशि-१

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २८ मार्च, २०१३

<u>वाचा</u> –

१) शासन निर्णय क्रमांकः बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९
२) शासन निर्णय क्रमांकः महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११

<u>प्रस्तावना</u> –

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्वत्र प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत (अनुदानित २०५४४ विनाअनुदानित १२११८).

२. सन २००२ मध्ये भारतीय घटनेत दुरुस्ती करुन ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत) याचा मूलभूत अधिकार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने केंद्रशासनाने **"बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९"** हा कायदा पारित केला असून त्यांची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०१० पासून सुरु झालेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ एप्रिल, २०१२ रोजी हा कायदा वैध ठरविला आहे. या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने **"महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११"** याप्रमाणे नियम अधिसूचित केले आहेत.

३. **“अधिनियम, २००९”** च्या तरतूदीनुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत, सक्तीचे व गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत) देण्याची मुख्य जबाबदारी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधित शाळा यांची आहे. याबाबत अधिनियमाच्या काही ठळक तरतूदी खालीलप्रमाणे प्रामुख्याने आहेत.

**कलम ३ (१)**

"every child of the age of six to fourteen years shall have a right to free and compulsory education in a neighborhood school till completion of elementary education".

**कलम (४)**

"Where a child above six years of age has not been admitted in any shool or though admitted could not complete his or her elementary education, then, he or she shall be admitted in a class appropriate to his or her age; ------ and shall be entitled to free education till completion of elementary education."

**कलम ८ (b) व (f)**

"Government to ensure of availability of neighborhood as specified in section ६".

"Government to ensure and monitor admission attendance and completion of elementary education by every child.

**कलम ९ (b) व (e)**

"Local authority to ensure availability of neighborhood as specified in section ६".

"Local authority to ensure and monitor admission attendance and completion of elementary education by every child residing within its jurisdiction."

**कलम १२ (१) (a)**

"School specified in sub-clause (i) of clause (n) of section २ shall provide free and compulsory elementary education to all children admitted therein"

४. **"अधिनियम, २००९"** मधील तरतूदी पाहता सर्व शाळाबाह्य मुलांचा सतत शोध घेणे तसेच त्यांना वयानुरुप वर्गात पाठविणे व टिकविणे आवश्यक आहे. अधिनियमातील तरतूदीनुसार इयत्ता ८वी मधून ही बालके प्राथमिक शिक्षण यशस्विरित्या पूर्ण करुन बाहेर पडतील हे पहाण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था व संबंधित शाळा व्यवस्थापनाची झालेली आहे. हे करण्यासाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे व इयत्ता ८वी उत्तीर्ण होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर सतत नजर ठेवणे आवश्यक आहे.

५. स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा व्यवस्थापन समित्या व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी शाळांमार्फत घेतलेल्या शोध मोहिमेत सन २०१२-१३ मध्ये सुमारे २ लाख शाळा बाह्य मुले दिसुन आलेली आहेत. या शाळाबाह्य मुलांची गावनिहाय यादी उपलब्ध आहे. अशा प्रकारे शाळाबाह्य मुलांबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा व्यवस्थापन समिती व शाळा यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून शासन खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>शासन निर्णय</u>** -

१ (१.१) स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा व शाळा व्यवस्थापन समिती यांनी शाळाबाह्य मुलांचा नियमितपणे आढावा घ्यावा व आढावा घेताना नजीकच्या क्षेत्राचा (१, ३ व ५ कि.मी . परिसरात) विचार करावा.

(१.२) शाळाबाह्य मुलांच्या पालकांना भेटून, त्यांना शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करावे व वयानुरुप वर्गात प्रवेश देवून इयत्ता आठवी पर्यंत शिकविण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करावी.

(१.३) शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांनी दर दोन महिन्यामध्ये तपासणी करावी व त्यांच्या कार्यकक्षेमध्ये एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. शाळेत दाखल न झालेली मुले वरिष्ठांना आढळून आली तर संबंधीतांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३. शिक्षक संचालकांनी सर्व शाळा बाह्य मुलांचे संगणकीकरणांव्दारे ट्रॅकिंग (Tracking) करावे. त्यासाठी आवश्यक तो संगणकीय कार्यक्रम (Software Program) त्वरीत तयार करून घ्यावा.

४. वरील कार्यवाहीचा आढावा शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी प्रत्येक दोन महिन्यांनी क्षेत्रीय यंत्रणेकडून घ्यावा व एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०३३०१०३१५७०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.03.30 11:27:48 +05'30'

**ना.ऊ.रौराळे**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
३. मा. मुख्यमंत्री /उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंबई.
४. मा. सर्व सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव.
६. मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
७. मा. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. मा. जिल्हाधिकारी, (सर्व).
९. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
१०. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
११. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
१२. मा. सर्व विधानसभा/ विधानपरिषर सदस्य विधान भवन, मुंबई.
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे.
१४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य पुणे.
१५. शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे.
१६. संचालक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ(बालभारती), पुणे
१९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२०. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
२१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२२. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/प्रौढ), जिल्हा परिषद सर्व.
२३. मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद, सर्व
२४. निवड नस्ती (प्राशि-१ कार्यासन